श्री लक्ष्मीकेशव प्रसन्न

प्रिय नेने कुल बंधु भगिनी

सस्नेह नमस्कार,

नेने कुलमंडळाच्या अधिवेशनाची पर्वणी पुन्हा आली आहे. दर दोन वर्षांनी येणाऱ्या या सोहळ्याची आपण सर्वजण वाट बघत असतो. कारण ही संधी असते आपल्याशी ज्यांची नाळ जन्मानेच जोडली गेली आहे अशा आपल्या सुहृदांना भेटण्याची, नवे स्नेहबंध जुळविण्याची व जुन्यांना उजाळा देण्याची! यंदाचे आपले अठरावे संमेलन दि. १६ व १७ जानेवारी २०१६ रोजी गुरुकृपा मंगल कार्यालय, रत्नागिरी येथे संपन्न होत आहे.

## १८ वे द्वैवार्षिक संमेलन

दि. १६ व १७ जानेवारी २०१६, रत्नागिरी

::: प्रमुख पाहुणे :::

**डॉ. अशोक नेने**

– रिटायर्ड प्रोफेसर ऑफ सिव्हील इंजिनियरिंग आणि डीन व्ही. एन. आय. टी., नागपूर

::: सन्माननीय उपस्थिती :::

**श्री. शरदच्चंद्र कृष्णाजी नेने**

::: समारोपाचे पाहुणे :::

**श्री. विक्रम नेने, नागपूर**

# कार्यक्रम

## १६/०१/२०१६ प्रथम दिवस

| | |
|---|---|
| नेने मंडळींचे आगमन | दुपारी १२ वाजता |
| परस्पर परिचय | १२ ते १.३० |
| सहभोजन | १.३० ते २.३० |
| लक्ष्मी केशव दर्शन, कोळीसरे | २.३० ते ५.३० |
| चहापान | ५.३० ते ६.०० |
| चौकट प्रस्तुत – गीतसुगंध मराठी गाण्यांचा कार्यक्रम | ६.३० ते ८.३० |
| भोजन | ८.३० ते ९.३० |

## १७/०१/२०१६ द्वितीय दिवस

| | |
|---|---|
| अल्पोपहार आणि सभासद नोंदणी | ८.०० ते ९.०० |
| प्रमुख पाहुणे आगमन | ९.०० ते १०.०० |
| दीपप्रज्वलन | |
| प्रमुख पाहुणे डॉ. अशोक नेने, नागपूर यांचे स्वागत आणि सत्कार | |
| सन्माननीय पाहुणे श्री. शरदच्चंद्र कृष्णाजी नेने यांचे स्वागत आणि सत्कार | |
| नेने वार्ता अंक प्रकाशन | |
| प्रमुख पाहुण्यांचे विचार | |
| सन्माननीय पाहुण्यांचे विचार | |
| नेने गुणीजनांचा सत्कार | १०.०० ते १०.१५ |
| श्री चंद्रशेखर नेने यांचे व्याख्यान थोरले बाजीराव | १०.१५ ते १०.४५ |
| तीन प्रथितयश चित्तपावनांचा सत्कार व सत्काराला उत्तर<br>श्री. विजय देसाई, पावस<br>डॉ. सुनिल आठवले, देवगड<br>डॉ. प्रशांत पटवर्धन, लोटे, ता. खेड | १०.४५ ते ११.४५ |
| मुलाखत – डॉ. स्वाती नेने बेडेकर आणि श्याम बेडेकर | ११.४५ ते १२.४५ |
| समारोप – श्री. विक्रम नेने, नागपूर यांचे शुभहस्ते | १२.४५ ते १२.५५ |
| आभार प्रदर्शन | १२.५५ ते १३.०० |
| भोजन समारंभ | १३.०० ते १४.०० |

टीप: कार्यक्रमात आयत्या वेळी बदल करायचा अधिकार मंडळाचा आहे.

याप्रसंगी आपण विविध क्षेत्रात विशेष कामगिरी केलेल्या नेने कुलबंधू-भगिनींचा गौरव करणार आहोत. माहिती, मैत्रीसंवर्धन व मनोरंजन असा दोन दिवसांचा भरगच्च कार्यक्रम आखण्यात आला आहे.

वक्तशीर, चोख नियोजन व कुलबंधू-भगिनींचा जिव्हाळा यामुळे आजवर आपली संमेलने संस्मरणीय ठरत आली आहेत. यावर्षीही ही परंपरा आपण पुढे चालवू याचा आम्हाला विश्वास वाटतो. प्रतीक्षा आहे, ती आपल्या विक्रमी सहभागाची!

आपले

श्री. मधुसुदन नेने (अध्यक्ष)

श्री. संतोष नंदकिशोर नेने (उपाध्यक्ष)

श्री. मंगेश त्रिंबक नेने (कार्यवाह)

श्री. रविंद्र शंकर नेने (खजिनदार)

नेने कुलमंडळ